**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः इजाज सलाउददीन सयद ,

वयः ३७ वर्षे, व्यवसायः नोकरी, पोहवा. ब.क्र.११७८.

राहणारः गोरेगाव, ता. माणगांव, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. दिनांक १२/०३/२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन, कोलाड येथे कार्यरत होतो. त्यादिवशी मला चिंचवली तर्फे दिवाळी फोंडा आदिवासीवाडी येथील डिमाजी पवार म्हणजेच आरोपी त्याचे घरी गावठी हातभटटीची दारु बाळगुन विक्री करीत असल्याची गोपनिय माहिती मिळाली. सदर माहिती सहा. पोलीस निरीक्षक यांना देवुन त्यांचे आदेशाने मी, पोलीस कर्मचारी श्री. राऊळ व श्री. म्हात्रे मिळुन आमचे खाजगी वाहनाने खोंडा आदिवासीवाडी येथे गेलो. तेथुन श्री. राऊळ यांनी दोन पंचांनाा छाप्याचे अनुषंगाने आवश्यक माहिती देवुन आमचेसोबत घेतले. त्यानंतर आम्ही अंतर्गत रस्त्याने आरोपीचे घराचे मागे गेलो असता तेथे तो प्लॅस्टीकचे कॅन घेवुन बसलेला आम्हाला आढळला. त्यामुळे मी त्याला पकडले. ती वेळ दुपारी १२.१५ ची होती. त्यानंतर त्याचे ताब्यातील कॅनमध्ये काय आहे याची पंचांसमक्ष खात्री केली असता त्यामध्ये आम्हाला गावठी हातभटटीची ०५ लिटर दारु मिळाली. त्यापैकी १८० मिली दारु सि.ए. परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद करण्यात आली. सदर मुददेमाल जप्त करुन त्यावर

पंचांच्या व श्री. राऊळ यांचे सहीचे लेबल लावण्यात आले. श्री. राऊळ यांनी तेथे पंचनामा तयार केला. त्यानंतर आम्ही जप्त मुददेमाल, नमुना व आरोपीसह पोलीस स्टेशनला परत आलो. तेथे मी घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी दिली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येतो. मी आरोपी ओळखतो. तो आज न्यायालयामध्ये हजर नाही. अर्ज नि.क्र.१६ वरील आदेशाप्रमाणे आरोपीस आज न्यायालयात हजर राहण्यापासुन सुट देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. सागर भगत यांच्यामार्फत सुरू.**

०२. घटनास्थळी जाण्यापुर्वी मी स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी जाण्याकरीता वापरलेल्या खाजगी वाहनाचा तपशिल माझे फिर्यादीमध्ये नमुद नाही. मी पंचांना अगोदरपासुन ओळखत नव्हतो. आरोपीचे ताब्यात मिळालेल्या प्लॅस्टीक कॅनमधील द्रव्य गावठी दारु असल्याची खात्री त्याचा वास घेवुन आम्ही केली होती. हे मी सांगु शकत नाही की, बाजारामध्ये अल्कहोल मिश्रीत परफयुम उपलब्ध असतात किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे ताब्यात मिळालेल्या कॅनसारखी कॅन बाजारामध्ये विकत मिळते, कथीत घटनास्थळी आम्हाला दारु विकत घेणारे ग्राहक मिळाले नव्हते, प्लॅस्टीक कॅन आरोपीचे घराचे आतमधुन मिळाले नव्हते, कथीत घटनास्थळ खुली मोकळी जागा आहे, तेथे कुणीही येवु जावु शकते.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी मोक्यावर माझे मोबाईलद्वारे छायाचित्रे काढली होती, सदर मोबाईल फोन कोणत्या कंपनीचा आहे हे फिर्यादीमध्ये नमुद

नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, ही बाब पुरावा अधि. कलम ६५ बी चे प्रमाणपत्रामध्ये नमुद आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, छाप्याकरीता गेल्यानंतर कधी कधी आम्हाला बेवारस मुददेमाल मिळतो, घटनेचेवेळी गोपनिय माहितीचे आधारे मी, इतर पोलीस कर्मचारी व पंच मिळुन घटनास्थळावर छापा टाकला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मोक्यावर आम्हाला बेवारस मुददेमाल मिळाला होता, त्यावरुन मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली, मी बाजारातील कॅन मोक्यावर ठेवुन त्याचे माझे मोबाईलद्वारे फोटो काढले, आम्हाला आरोपीचे ताब्यात प्लॅस्टीक कॅनमध्ये ०५ लिटर गावठी हातभटटीची दारु मिळाली नव्हती.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी फोटो काढण्याचे प्रशिक्षण घेतलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासणीमध्ये सांगीतल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही, मी आज वरिष्ठांचे सांगण्यावरुन न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.01.06 17:42:17 +0530

(एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

स्थळ : रोहा.
दि.०६.०१.२०२५.